मातृत्वासाठी महिलेवर दडपण नको

आरोग्य वार्ता

नवी दिल्ली : भारतीय कुटुंबे आणि समुदायांमध्ये मातृत्वाविषयी वयानुसार अपेक्षा असतात. एखादी स्त्री ३० वर्षांची झाली की, ती मातृत्वाबाबत समाज आणि कुटुंबाकडून येणाऱ्या दबावामुळे चिंताग्रस्त होते. परंतु, 'मुले जन्माला घालण्याचे निर्णय वेळेच्या आधारावर न घेता महिलेची वैयक्तिक तयारी, एकूण आरोग्य आणि वैद्यकीय सेवेची उपलब्धता यानुसार घेतले पाहिजेत,' असे स्त्रीरोगतज्ज्ञांचे म्हणणे आहे.

''वय आणि प्रजननक्षमता यांच्यात एक स्पष्ट वैद्यकीय संबंध आहे, परंतु ते जबाबदारीने सांगितला पाहिजे. महिलांवर दबाव आणण्यासाठी वयाचा वापर करणे योग्य किंवा उपयुक्त नाही. आजकाल गर्भधारणेच्या परिणामांवर जीवनशैली, पोषण, मानसिक आरोग्य आणि वेळेवर वैद्यकीय मदत अशा अनेक घटकांचा प्रभाव पडतो,'' असे 'सिल्वरस्ट्रीक मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल'चे प्रसूति आणि स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. स्वप्निल अग्रहारी म्हणाले.

वयानुसार, विशेषतः ३० च्या दशकाच्या मध्यानंतर, प्रजननक्षमता हळूहळू कमी होत असली तरी, या जैविक वास्तवाचा वापर चिंता निर्माण करण्यासाठी किंवा घाईघाईने निर्णय घेण्यासाठी करू नये. त्याऐवजी, तज्ज्ञ माहितीपूर्ण नियोजन, लवकर सल्लामसलत आणि नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व या बाबी विचारात घ्याव्यात, असे तज्ज्ञांनी सुचविले आहे.

बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक
गोल्ड लोन
@8.35%*
शून्य प्रक्रिया शुल्क
मिस्ड कॉल द्या 8010 614 614
अर्जासाठी स्कॅन करा

Since 1992 Tanvi TANVI HERBAL PRODUCTS
Since 2017 Tanvi HERBALS
एनर्जेटिक रहाण्यासाठी
आम्ही रोज घेतो
गहू रोप रस सत्वयुक्त
व्हिटाग्रासो टॅबलेट
Tanvi HERBALS WHEATAGRASSO
तन्वी क्लिनिक ठाणे रोज 11 ते 1 फ्री चेकअप व फ्री फोन कन्सल्टेशन 9820075813

'बुजगावणं' महाअंतिम फेरीत

छत्रपती संभाजीनगरमध्ये विभागीय अंतिम फेरी उत्साहात

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : आठवडाभरापासून स्पर्धेकडे लागलेले डोळे... अन् प्रथम, द्वितीय आणि तृतीय कोण याची लागलेली उत्कंठा...महाविद्यालयीन तरुणाईची गर्दी... प्रत्येक निवडलेल्या पारितोषिकावर टाळ्यांचा कडकडाट... अशा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात 'लोकसत्ता लोकांकिका' विभागीय अंतिम फेरी रविवारी येथे पार पडली. स्पर्धेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागाची 'बुजगावणं' ही लोकांकिका मुंबईत होणाऱ्या महाअंतिम फेरीसाठी निवडण्यात आली. तर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाची 'जिव्हाळा' द्वितीय तर सरस्वती भुवन शिक्षण संस्थेची 'वयाचं गणित' ही लोकांकिका तृतीय आली.

येथील प्रख्यात संत एकनाथ रंगमंदिरात पार पडलेल्या स्पर्धेशी श्रीकांत भिडे व ऋषी मनोहर यांनी परीक्षणाची जबाबदारी पेलली. तर पारितोषिक वितरण छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, 'डीएनएसबी' बँकेचे व्यवस्थापक विपुल आचार्य यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. उद्घाटन सत्राला एमजीएम विद्यापीठातील नाट्यशास्त्र विभागाचे प्रमुख शिवकदम यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

INDIA'S LARGEST CONTAINER PORT
जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
प्रस्तुत
लोकसत्ता लोकांकिका
सहप्रस्तुती
सॉफ्ट कॉर्नर
सहप्रायोजक
LABINDIA Vida
टॉकीज
Punit Balan Group
सोसायटी

- **मुख्य प्रायोजक :** जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
- **सहप्रस्तुती :** सॉफ्ट कॉर्नर
- **सहप्रायोजक :** लॅबइंडिया विदु इलेक्ट्रिक बायसिकल, झी टॉकीज, पुनित बालन ग्रुप, सोसायटी टी, डोंबिवली नागरी सहकारी बँक लि. आणि लालू बंधू ज्वेलर्स
- **पॉवर्ड बाय :** एन एल दालमिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज ॲंड रिसर्च
- **साहाय्य :** अस्तित्व
- **टॅलेंट पार्टनर :** आयरिस प्रॉडक्शन

'लोकसत्ता लोकांकिका' स्पर्धेच्या माध्यमातून तरुण कलावंतांना एक उत्तम व्यासपीठ मिळालेले असून, या स्पर्धेतून नव्या कलावंतांना राज्य, राष्ट्रीय पातळीवर सादरीकरण करण्याची संधी मिळत आहे. ही स्पर्धा महाविद्यालयीन कलावंतांसाठी राबवलेला उत्तम उपक्रम आहे.
– दिलीप स्वामी, जिल्हाधिकारी

अंतिम फेरीचा निकाल

- **सर्वोत्कृष्ट लोकांकिका** प्रथम - 'बुजगावणं', द्वितीय - 'जिव्हाळा', तृतीय - 'वयाचं गणित.' सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक - धीरज सोनवणे (जिव्हाळा)
- **सर्वोत्कृष्ट लेखक** - गोपाळ वाघमारे (बुजगावणं)
- **सर्वोत्कृष्ट अभिनय (स्त्री)** - रेणुका साळुंके (जिव्हाळा- पात्र - सोनी),
- **परीक्षक पसंती अभिनय** - राखी गोरखा (पिसाळा-पात्र- आई)
- **सर्वोत्कृष्ट अभिनय (पुरुष)** धीरज सोनवणे,
- **सर्वोत्कृष्ट नेपथ्यकार** - जिव्हाळा संघ
- **सर्वोत्कृष्ट संगीत** - बुजगावणं
- **सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजना** - चेतन ढवळे (पिसाळा).

स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून काम करण्याचा खूपच सुंदर अनुभव होता. या सर्व मराठी एकांकिकांचे एक विशेष वैशिष्ट्ये हे आहे, की आपण मातीला धरून आहोत. त्यातल काही वेगळेपण शोधतो आहोत. त्यावेळेला नाटक कसं पुढे जातंय, हेही बघितलं पाहिजे. म्हणजे नाटक करण्याची पद्धत बदलत चालली आहे. विषयांना बंधन नाही. नाटक हे व्यक्त होण्याचं माध्यम आहे. लेखक, दिग्दर्शकांनी काय विषय घ्यायचे आहेत, किंबहुना ते विषय मातीतलेच घेणे गरजेचे आहे. पण नाटक कुठल्या दिशेने चालले आहे, जागतिक स्तरावरिल नाटकांचा बाझ काय आहे, याचाही मेळ घातला पाहिजे, हे आमचे निरीक्षण आहे.
– श्रीकांत प्रभाकर भिडे, परीक्षक

पाचपैकी चार एकांकिका या मातीतल्या किंवा शेतीप्रधान संस्कृतीच्या विषयाशी संबंधित होत्या. उत्तम पद्धतीने स्पर्धा पार पडली. मनापासून सादरीकरण करताना पाहणे आनंददायी होते. स्पर्धेतील लेखकांना एक आवाहन आहे की, मुंबईचे थिएटर पाहा, नवीन विषय शोधा.
– ऋषी मनोहर, परीक्षक

धमक्यांना घाबरणार नाही!

तपोवन वृक्षतोड प्रकरणातील याचिकाकर्ते ॲड.पिंगळे यांचा निर्धार

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : तपोवनातील वृक्षतोडीविरोधात राष्ट्रीय हरित लवादात याचिका दाखल करताना कोणती कागदपत्रे सादर केली, मुद्दे मांडले, याची माहिती याचिकाकर्ते ॲड. श्रीराम पिंगळे यांनी रविवारी तपोवनातील पर्यावरणप्रेमींशी संवाद साधताना दिली. पुढील लढाईसाठी नाशिककरांनी आवश्यक दस्तावेज, कागदपत्रे द्यावीत. जेणेकरून ही लढाई आवश्यकता भासल्यास सर्वोच्च न्यायालयापर्यंत लढली जाईल. कुठल्याही प्रलोभनांना वा धमक्यांना आपण बळी पडणार नसल्याचा विश्वास ॲड. पिंगळे यांनी पर्यावरणप्रेमींना दिला.

कुंभमेळ्यासाठी तपोवनमधील ५४ एकर क्षेत्रात साधुग्रामची उभारणी आणि ३५ एकर क्षेत्रात प्रदर्शनी केंद्राचे (माईस हब) नियोजन यासाठी प्रस्तावित १८२५ झाडे तोडणे, पुनर्रोपणावरून

तपोवन पाहणीप्रसंगी ॲड. श्रीराम पिंगळे यांना पर्यावरणप्रेमींनी निवेदन दिले. (छायाचित्र- यतीश भानू)

महापालिका आयुक्तांची वादग्रस्त विधाने

कुंभमेळ्यासाठी तपोवनातील प्रस्तावित वृक्षतोडीच्या विषयात राष्ट्रीय हरित लवादासमोर याचिका दाखल करताना महापालिकेची नोटीस, वृत्तपत्रातील बातम्यांची कात्रणे सादर करण्यात आली होती. महापालिका आयुक्त मनिषा खत्री यांच्या या विषयावरील टिप्पणीचा काही भाग लवादासमोर भाषांतरित करून मांडला गेला. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन हरित लवादाने तातडीने अंतरिम आदेश दिल्याची माहिती याचिकाकर्ते ॲड. श्रीराम पिंगळे यांनी दिली. त्यामुळे तपोवनातील वृक्षतोडीसंदर्भात मनपा आयुक्तांची काही विधाने वादाच्या भोवऱ्यात सापडली आहेत.

स्थानिक पातळीवर रणकंदन माजले आहे. या वृक्षतोड प्रकरणी पुण्यातील वकील श्रीराम पिंगळे यांनी हरित लवादासमोर याचिका केली. लवादाने पालिकेला अंतरिम आदेश देत चाप लावला आहे.

लोकसत्ता वार्ताहर

शस्त्रक्रियेनंतर युवतीचा मृत्यू

सावंतवाडी : कणकवली येथील एका खासगी रुग्णालयात डोक्यावरील गाठ काढण्यासाठी शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या १९ वर्षीय युवतीचा कोल्हापूर येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला. शस्त्रक्रियेनंतर रक्तस्राव थांबत नसल्याने तिला कोल्हापूरला हलविण्यात आले होते. या घटनेनंतर संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी रविवारी दुपारी युवतीचा मृतदेह थेट कणकवलीतील खासगी रुग्णालयाच्या दारात ठेवून तीव्र आंदोलन केले. डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळेच युवतीचा बळी गेल्याचा आरोप करत संबंधित डॉक्टरवर तातडीने कारवाई करण्याची मागणी या वेळी करण्यात आली.

या युवतीला शुक्रवारी कणकवलीतील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. तेथेच तिच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. मात्र, शस्त्रक्रियेनंतर तिचा रक्तस्राव न थांबल्याने तिला पुढील उपचारासाठी कोल्हापूर येथील रुग्णालयात हलवण्यात आले. परंतु, उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला.

ज्येष्ठ साहित्यिक धनंजय चिंचोलीकर यांचे निधन

छत्रपती संभाजीनगर : ज्येष्ठ साहित्यिक, बब्रुवान रुद्रकंठवार या टोपण नावाने विनोदी शैलीत लिहिणारे लेखक धनंजय चिंचोलीकर (वय ५९) यांचे रविवारी पहाटे हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दुपारी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी आणि एक मुलगा असा परिवार आहे.

मूळचे कन्नड तालुक्यातील चिंचोली येथील रहिवासी राहिलेल्या चिंचोलीकर यांचे बालपण, शिक्षण वैजापुरात झाले. मराठवाडा, लोकपत्र, तरुण भारत वर्तमानपत्रात पत्रकारिता केल्यानंतर ते कथा, नाटक आदी साहित्य लिखाणाकडे वळले. मात्र, त्यांनी लेखन केले ते टोपण नावाने. त्यांच्या 'आमदमी विदाऊट पार्टी' या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कारही मिळाला आहे.

मंडणगड पालवणे भागात बिबट्याचा संचार

लोकसत्ता, प्रतिनिधी

रत्नागिरी : रत्नागिरी जिल्ह्याच्या मंडणगड तालुक्यात पालवणे भागात बिबट्याच्या मुक्त संचाराने लोकांमध्ये भीतीचे वातावरण तयार झाले आहे. मागील दोन दिवसांत चार वासरांचा फडशा पाडल्यामुळे वन विभागाने तातडीने बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी करण्यात येत आहे.

पालवणे धनगरवाडी येथील शेतकरी महेश हिरवे व नामदेव हिरवे यांची एकूण ४ वासरे बिबट्याने मारल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. बिबट्याच्या मुक्त संचाराने सर्व शेतकरी भयभीत झाले आहेत. बिबट्यांचा वावर पालवणे परिसरात दिवसेंदिवस वाढत असून दुग्धव्यवसाय धोक्यात आला आहे.

जळगावमध्ये अपघातात तीन ठार; पाच प्रवासी गंभीर

जळगाव : जिल्ह्यातील भुसावळ-जामनेर रस्त्यावर गंगापुरी गावाजवळ रिक्षाला मालमोटारीने धडक दिल्याने महिला आणि मुलीसह तिघांचा मृत्यू झाला. तर पाच प्रवासी गंभीर जखमी झाले. सरला निंबाळकर (३९), निकिता निंबाळकर (२०, दोघा रा. चिंचखेडा) या मायलेकी आणि प्रमोद गुरुचे (४९, रा. तळेगाव, ता. जामनेर) अशी मृतांची नावे आहेत. भुसावळकडून जामनेरच्या दिशेने जाणाऱ्या रिक्षाला समोरून येणाऱ्या मालमोटारीची धडक बसली. या अपघातात निकिता आणि प्रमोद हे दोघे गंभीर जखमी झाले. त्यांना जामनेर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. जखमी सरला निंबाळकर (५०) यांना जामनेर उपजिल्हा रुग्णालयातून वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात हलविण्यात आले. यावेळी सरला यांचाही रस्त्यातच मृत्यू झाला.

लोकसत्ता Classifieds

यात्रासहल

दोस्तीटूर- शास्त्रोक्तनर्मदापरिक्रमा, कुरवपूरम- पिठापूरम, कोस्टल कर्नाटका, रन ऑफ कच्छ, राजस्थान, आसाम- अरूणाचल- मेघालय, नेपाळ- मुक्तीनाथ, सिंगापूर- थायलंड- मलेशिया, भुतान- 9594880123/ 9702251584

0070987728-7

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइझिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

सिडको शहरांचे शिल्पकार

बोली मागविणारी सूचना

कुंडेवाहल, नवी मुंबई येथील सेंटर ऑफ एक्सलन्स अंतर्गत इंटरनॅशनल एज्युसिटी भाग १ याकरिता जमिनीचा विकास

सिडको ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, ई-टेंडरिंग प्रक्रियेद्वारे, अनिवार्य पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या अनुभवी संभाव्य बोलीदारांकडून, आणि परिशिष्ट-१ यानुसार एकूण १०० गुणांचा समावेश असलेल्या तांत्रिक बोली मूल्यांकनात किमान ७५ गुण मिळवणारे, ज्यांनी खाली नमूद केलेल्या कामासाठी एमएमआर प्रदेशात नियंत्रित ब्लास्टिंग किंवा वेजिंग आणि चिझेलिंगद्वारे किंवा लाइन ड्रिलिंगद्वारे सारख्याच स्वरूपाचे काम पूर्ण केले आहे यांच्याकडून **दोन बोली प्रणालींमध्ये** (भाग-१ तांत्रिक बोली आणि भाग-२ व्यावसायिक बोली) **'ऑनलाइन'** बाब दर बोली आमंत्रित करीत आहे.

१. कामाचे नाव: कुंडेवाहल, नवी मुंबई येथील सेंटर ऑफ एक्सलन्स अंतर्गत इंटरनॅशनल एज्युसिटी भाग १ याकरिता जमिनीचा विकास. २. सी. ए. क्र.: ०७/सिडको/ईई(सीपी)/२०२५-२६, **३. नियुक्त क्षेत्रातून काढायच्या खडकाचे प्रमाण :** १३६,९२,५१७.९० मेट्रिक टन, **४. कंत्राटदाराची ऑफर :** ठेकेदाराची मालमत्ता असल्याने, दगड/माती काढण्यासाठी कंत्राटदाराला त्याचा प्रीमियम द्यावा लागेल. **५. ई.एम.डी.:** रु. २,७०,००,०००.००, **६. पूर्णत्वाचा कालावधी :** ४८७ (चारशे सत्याऐंशी) दिवस (पावसाळासहित), **७. निविदा प्रक्रिया शुल्क :** रु. ५९,०००.०० १८% जीएसटीसह. (परतावा न होणारा)

बोली कागदपत्र आणि बोली कार्यक्रम वेबसाइट https://mahatenders.gov.in यावर दि. १५.१२.२०२५ रोजीपासून १७.०१ वाजता उपलब्ध असतील.

अधीक्षक अभियंता (पीॲण्डके)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/४४५/२०२५-२६

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

परिशिष्ट-IV-ए – ई-लिलाव – स्थावर मालमत्तेची जाहीर विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ८(६) च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव-विक्री सूचना

नोंदणीकृत कार्यालय : ९वा मजला, अंत्रिक्ष भवन, २२ कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली-११०००१, फोन्स : ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबसाइट : www.pnbhousing.com

शाखा कार्यालय नाशिक : ४०७ व ४०८, ४था मजला, पद्मा विश्व लँडमार्क, तनिश्क शोरुमजवळ, ॲक्सिस बँकेच्या वरती, राक्का कॉलनी, शहारणपूर रोड, नाशिक-४२२००२.

याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून रकाना नं. "ए" मध्ये दर्शविलेल्या ऋणको व हमीदारांना सूचना देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण असलेल्या/ ताब्यात असलेल्या याखालील रकाना नं. "डी" मध्ये वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा विधायक/ प्रत्यक्ष ताबा (रकाना नं. "सी"मध्ये वर्णिल्यानुसार) **मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**/ सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्री याखाली दिलेल्या तपशीलानुसार **"जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे"** आणि **"जे काही आहे तेथे आहे"** या तत्त्वावर करण्यात येणार आहे. ऋणको/ गहाणकार/ विधि वारसदार, विधि प्रतिनिधी (जे ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत), तारखेनुसार सुधारित केल्याप्रमाणे सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ च्या रुल ८(६) व ९ अंतर्गत रकाना नं. "ए" मध्ये दर्शविल्यानुसार, जसे असेल त्यानुसार, संबंधित ऋणको / गहाणकारांचे (दिवंगत असल्यामुळे) निष्पादक, प्रशासक, उत्तराधिकारी, अभिहस्तांकिती यांना याद्वारा सूचना देण्यात आली आहे. विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता कृपया **मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/ सुरक्षित धनकोच्या** www.pnbhousing.com या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहावी.

लोन नं./ ऋणको/ सह-ऋणको/ हमीदार/ विधि वारसदाराचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम व तारीख (बी)	ताब्याचा प्रकार (सी)	गहाण असलेल्या मालमत्तेचे वर्णन (डी)	राखीव किंमत (आरपी) (ई)	इरठे (आरपीची १०%) (एफ)	बोलीच्या सादरीकरणाची शेवटची तारीख (जी)	बोली वृद्धी दर (एच)	पाहाणीची तारीख व वेळ (आय)	लिलावाची तारीख व वेळ (जे)	ज्ञात भार / न्यायालयीन प्रकरण, जर असल्यास (के)
HOU/NSK/1221/933295 / प्रमोद के. झाडे/ जयश्री प्रमोद झाडे/ शाखा कार्यालय : नाशिक	रु. १६६१४६३.०५ व ०६.०६.२०२३ रोजीप्रमाणे	प्रत्यक्ष ताबा	फ्लॅट नं. ३, पहिला मजला, प्लॉट नं. २१, सर्व्हे नं. १२३/ ए/ १, गणराज हाईट्स अपार्टमेंट, धृव नगर, गंगापूर सातपूर लिंक रोड, निगल पार्कच्या मागे, विठ्ठल रुक्मिणी मंदरासमोर, बबन लॉन्ससमोर, शिवाजी नगर, गंगापूर शिवार, नाशिक – ४२२००७, महाराष्ट्र, भारत.	रु. १०४४०००	रु. १०४४००	२९.१२.२०२५	रु. १०,०००/-	२२.१२.२०२५ रोजी दु. १२:०० व दु.०४:०० दरम्यान	३०.१२.२०२५ रोजी दु.०२.०० व दु. ०३:०० दरम्यान	ज्ञात नाही
HOU/NSK/0817/416631 & NHL/NSK/1018/585309/ धोंडीराम चिंतामण लोहाकरे/ मनिषा धोंडीराम लोहाकरे/ शाखा कार्यालय : नाशिक	रु. २५०८५९३.७४ व २३.०६.२०२१ रोजीप्रमाणे	प्रत्यक्ष ताबा	फ्लॅट नं. बी १३, जळमजला, श्रीमंत होम्स, बिल्डिंग बी, सर्व्हे नं. ७९ २ए व ७९ ४ए, मातोश्री प्रेरणा लॉन्स, साई पॅलेस हॉटेलच्या मागे, विजय नगर, मौजे भागूर, महाराष्ट्र-४२२५०२, भारत.	रु. १५३६०००	रु. १५३६००	२९.१२.२०२५	रु. १०,०००/-	१७.१२.२०२५ रोजी दु. १२:०० व दु.०४:०० दरम्यान	३०.१२.२०२५ रोजी दु.०२.०० व दु. ०३:०० दरम्यान	ज्ञात नाही

*** त्याकरिता वसुली आणि/ किंवा प्रदानाच्या तारखेपर्यंत निघालेले लागू असल्याप्रमाणे १८% प्र.व. दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, किंमत, आकार, इ. सह एकत्रित. ** "पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"च्या प्राधिकृत अधिकारींना असलेले उत्तम ज्ञान व माहितीच्या अनुसार रकाना क्र. "के" मध्ये जे काही प्रकट केले आहे ते वगळता वर नमूद केलेल्या स्थावर/ सुरक्षित मत्तेवर तेथे कोणतेही भार/ दावे नाहीत. याअधिक, सदर भार यशस्वी खरीददार/ बोलीदाराद्वारा, त्याच्या/ तिच्याकडील, सोसावयाचे आहेत/ प्रदान करावयाचे आहेत. भावी खरीददार/ बोलीदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी स्थावर मालमत्तेवरील नमूद केलेल्या भाराची स्वतंत्ररीत्या पडताळणी करून निश्चित करावेत.** (१.) आजच्या तारखेनुसार, तेथे वरील स्थावर मालमत्ता/ सुरक्षित मत्तेची विक्री करणे, अभिहस्तांतरण आणि/ किंवा वासलात लावणे यापासून "पीएनबीएचएफएल"ला/ "पीएनबीएचएफएल"च्या प्राधिकृत अधिकारींना प्रतिबंध करण्यास कोणताही आदेश आणि / किंवा निषेधाज्ञा आलेली नाही आणि/ किंवा वरील स्थावर मालमत्ता/ सुरक्षित मत्तेची वासलात आणि दर्जा रकाना क्र. "के" मध्ये नमूद करण्यात आला आहे. (२.) भावी खरीददार/ बोलीदार आणि स्वारस्य असलेले पक्षकार रकाना नं. "के" मध्ये नमूद केलेली व मंजूर केलेली प्रक्रीया/ आदेश, इ., जर असल्यास, त्यामधील याचिकांबाबत तपासणी स्वतः स्वतंत्रपणे करू शकतील. समाविष्ट परंतु त्याकरिता "पीएनबीएचएफएल"कडे उपलब्ध असलेल्या संबंधित नामाधिकाराच्या कागदपत्रांचे नामाधिकार मर्यादेत नाहीत आणि निविदा/ बोली अर्ज प्रपत्र किंवा प्रस्ताव सादर करण्यापूर्वी सर्व बाबतीत स्वतःचे समाधान करून घ्यावे. बोलीदाराने बोली प्रपत्रासमवेत या लिलावाच्या शर्ती व अटी स्वाक्षरीकृत करून घ्यावयाच्या आहेत. (३.) कृपया नोंद घ्यावी की, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ९(३)च्या अनुसार, बोलीदार/ खरीददाराने त्याच दिवशी किंवा उशिरात उशिरा कामाच्या पुढील दिवशी विक्री किंमतीच्या (इसारा रक्कम समाविष्ट, जर भरलेली असल्यास) २५% ठेव, कायदेशीररीत्या बांधील असलेली, भरावयाची आहे. विक्री सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ९(२) च्या अनुसार सुरक्षित धनकोद्वारा विक्री किंमतीच्या २५% रकमेच्या स्वीकृतीनंतरच केवळ बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री विचाराधीन उर्वरित रकमेच्या ७५% विक्री निश्चितीकरण पत्राच्या अभिस्वीकृतीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत खरीददाराद्वारा भरावयाची आहे आणि सदर ठेव भरण्यात कसूर झाल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्री निश्चितीकरण पत्रात नमूद केलेल्या १५ दिवसांचा अनिवार्य कालावधी संपण्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत विक्री निश्चितीकरण रकमेचा भागशः प्रदान जप्त करतील आणि मालमत्ता / सुरक्षित मत्ता सरफेसी ॲक्टच्या तरतुदींच्या अनुसार पुन्हा विक्रीकरिता ठेवण्यात येईल. (४.) **सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ई-लिलावाद्वारा विक्रीच्या आयोजनात प्राधिकृत अधिकारीस सहाय्य करणार आहे. तिचे कॉर्पोरेट कार्यालय येथे असलेले - प्लॉट नं. ६८, तिसरा मजला, सेक्टर ४४, गुरगाव, हरयाणा-१२२००३ वेबसाइट - www.bankeauctions.com बोली कागदपत्रे प्राप्त करणे किंवा मालमत्तेच्या पाहाणीसंबंधित कोणत्याही सहाय्याकरिता आणि कोणत्याही अन्य शंका किंवा नोंदणीकरिता तुम्हास विवेक लोधा टोल-फ्री नं. : १८०० १२० ८८००, जी "पीएनबीएचएफएल"ची अधिकृत व्यक्ती आहे, यांच्याशी समन्वय साधावयाचा आहे किंवा www.pnbhousing.com या वेबसाइटला भेट द्यावी.**

स्थळ : नाशिक, दिनांक : १५.१२.२०२५ — **स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कटिबध्दा जनहिताय

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८

भूमि आणि जिंदगी विभाग

ई-निविदा सुचना क्र. १/२०२५-२६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची खाली नमूद केलेली मोकळी जागा ३० वर्ष कालावधीसाठी लिजने घेणेबाबत इच्छुक शैक्षणिक संस्था, यांचेकडून ई-निविदा पध्दतीने निविदा मागविणेत येत आहेत. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे.

अ. क्र	तपशील	अंदाजपत्रकीय दर रक्कम रुपये (शासन व मनपा करा व्यतिरिक्त)	बयाणा रक्कम रुपये	लिज कालावधी	निविदा फॉर्म फी GST सह (परत न मिळणारी)
१	२	३	४	५	६
१	पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील मौजे पुनावळे येथील सर्व्हे नंबर ३८ पै. व ४४ पै. मनपाच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक ४/५७ प्रमाणे एकुण क्षेत्र १.८० हेक्टर क्षेत्रापैकी ०.९१ हेक्टर आर क्षेत्रफळ मनपाच्या ताब्यात असलेली जागा शाळा विकसित करणे करिता देणे.	५७४००१०६/-	५७४००१/-	३० वर्षे	४५०००/-

सदर ई- निविदेतील मिळकतीचा तपशील अनामत, बयाणा रक्कम, नियम अटी, शर्ती इ. माहिती शासनाच्या https://www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदरची निविदा ई-निविदा ई-NIC च्या https://www.mahatenders.gov.in या वेबसाईटवरुन दि. १५/१२/०२५ ते दि. ०४/०१/२०२६ अखेर रात्री १२.०० वाजेपर्यंत ई-टेंडरींग पध्दतीने https://www.mahatenders.gov.in वेबसाईट वरुनच भरता येईल. निविदा सादर करणेसाठी महाराष्ट्र शासनाच्या बेबसाईटवर संगणकीकृत Self Registeration करणे व त्यानुसार निविदा सादर करणेची सुविधा बेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. निविदाधारकाने ई-निविदा सादर करण्यासाठी आवश्यक Class II/III with Organization Name Digital Key कोणत्याही Digital Key पुरवठा करणा-या Agency द्वारे स्वखर्चाने उपलब्ध करुन घ्यावी लागणार आहे. महानगरपालिके मार्फत Digital Key चा पुरवठा करणेत येणार नाही.

जाहिरात क्र.२०२५-२६/३५४
भूमि आणि जिंदगी विभाग
क्र. भूजि/८/कावि/२०९/२०२५
दि. ११/१२/२०२५

सही /- आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी-१८

सही/-(सितााराम बहुरे) उप आयुक्त, भूमि- जिंदगी विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी-१८